
# 'आरोग्यविमा आवश्यक'

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'हृदयरोगाच्या उपचारासाठी स्टेंटचा वापर केला जातो. मात्र त्यात तीनशे टक्क्याहून अधिक नफा असल्याचे बोलले जाते. उपचार, ऑपरेशन, औषधे, हॉस्पिटल या सर्वांचाच खर्च वाढला असल्याने आता प्रत्येक व्यक्तीने आरोग्य विमा उतरविण्याची आवश्यकता आहे,' असा सल्ला ज्येष्ठ हृदयरोग तज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ यांनी उपस्थित नागरिकांना दिला.

फॅमिली फिजिशियन डॉ. दिलीप देवधर लिखित व चंद्रकला प्रकाशन प्रकाशित 'बदलती जीवनशैली आणि आजार' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक पराग करंदीकर, बुकगंगाचे विवेक चितळे उपस्थित होते.

'घराघरांत सामाजिक स्वास्थाचे परिणाम दिसून येत आहेत. रक्तदाब, कोलेस्टरॉल, व्हिटॅमिन बी १२, डी ३ या गोष्टी नियंत्रित ठेवण्याची गरज आहे. सध्या जीवनशैली बदलल्याने मानसिक ताणतणावांना सामोरे जावे लागते. त्यामुळे व्यायाम, मैत्रीपूर्ण वातावरण, दिशा, मार्गदर्शक अथवा गुरु, चांगला आहार या गोष्टींची आवश्यकता आहे. त्याचे पालन केल्यास वैयक्तिक आरोग्य निरोगी राहू शकते,' असे ज्येष्ठ हृदयरोग तज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ यांनी सांगितले. कोणत्याही आजाराच्या उपचारासाठी आरोग्य विमा काढण्याचा सल्ला देताना शिक्षण, लग्नासाठी पैसे वेगळे काढतो. मग आरोग्यासाठी का नाही असा सवाल उपस्थित करून शरिरातील कॅलरीज पोटावर साठवून ठेवतो. त्यामुळे लठ्ठपणा तसेच पर्यायाने मधुमेहाचे आजार बळावत असल्याचे त्यांनी सांगितले.




'बदलती जीवनशैली आणि आजार' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी लेखक डॉ. दिलीप देवधर आणि हृदयरोग तज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ.

'बदलत्या जीवनशैलीमुळे सामाजिक आरोग्य बिघडत असून त्याबाबत आपण संवेदनशील आहोत का,' असा सवाल 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक पराग करंदीकर यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, 'समाजाचा रक्तदाब सध्या वाढला आहे. आपण सर्वजण गोड बोलतो. एखाद्या गोष्टीवर जाहीरपणे बोलणे टाळतो. त्यामुळे हा सामाजिक मधुमेह नियंत्रित करण्याची गरज आहे. शहरातील रस्त्याच्या परिस्थितीमुळे सांधेदुखी देखील वाढली आहे. नद्या, नाल्यांवर अतिक्रमण वाढले आहे. प्रदूषण कमी होत नसल्याने समाजाचे पोट देखील वाढले आहे. वैयक्तिकबरोबरच सामाजिक आरोग्याकडे देखील गांभिर्याने पाहिले पाहिजे.'

'संसर्गजन्य आजारांपेक्षा बदलत्या जीवनशैलीचे आजार वाढले आहे. प्रत्येकाचे जीवनमान उंचावले तरी आरोग्य घसरले आहे. ताण, व्यायामाचा अभाव, चुकीच्या आहारामुळे तरुण पिढी आजारी होत आहे,' असे डॉ. देवधर म्हणाले. चितळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रकाशक शशिकला उपाध्ये यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.